वारसा प्रमाणपत्र क्रमांक १/२०१८

मंगला भगवान पायघन–वि.–कोणीही नाही

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश
## (दिनांक ०८/०८/२०१८)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्रमांक १ मंगला भगवान पायघन यांनी त्यांचे पती आणि अर्जदार क्रमांक २ सौ.जयश्री प्रभाकर पाटील, अर्जदार क्र.३ सौ.राजश्री किशोर धनवई, अर्जदार क्र.४ प्रमोद भगवान पायघन आणि अर्जदार क्र.५ सौ.भाग्यश्री राम नागोलकर यांनी त्यांचे वडील मयत भगवान बाबुराव पायघन यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत केलेला आहे. अर्जदार यांचे असे कथन आहे आहे की, मयत नामे भगवान बाबुराव पायघन यांचे दिनांक २९/१०/२०१५ रोजी निधन झालेले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना अर्जदार क्रमांक १ ते ५ हेच कायदेशिर वारस आहेत. याशिवाय दुसरे कोणीही कायदेशिर वारस नव्हते व नाही.

२. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, मयत भगवान बाबुराव पायघन यांचे निधनानंतर अर्जदार यांस मयत यांच्या मालकीची व त्यांच्या नावे असलेली टाटा सुमो गाडी जी.एक्स. जीचा गाडी नं.एम.एच.२८-व्ही.९९२२ ही रजिष्ट्रेशन सर्टीफीकेटला अर्जदार क्र.४ वारस म्हणुन नोंद व्हावी म्हणुन वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता पडली आहे. त्यामुळे अर्जदारास वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर न्यायालयामार्फत जाहीरनामा निशाणी क्रमांक ९ काढण्यात आला होता तसेच निशाणी क्रमांक १५ अन्वये दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस काढण्यात आलेली होती. तसेच न्यायालयातर्फे जाहीरनामा लावण्यात आला होता. परंतु, प्रस्तुत अर्जास आजपावेतो कोणीही आक्षेप दाखल केलेला नाही.

४. अर्जदार क्रमांक ४ याने त्याचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक १२ अन्वये दाखल केले आहे. ग्राम पंचायत अंजनी बु., ता.मेहकर यांनी जारी केलेले भगवान बाबुराव पायघन यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१७, दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली जाहीर नोटीस नि.क्र.१५ वर दाखल केलेली

आहे. अर्जदार क्रमांक ४ यांचे आधार कार्डची सत्यप्रत नि.क्र.१६ वर दाखल केलेला आहे. ग्रामपंचायत अंजनी बु. यांनी जारी केले वारसाचा दाखल नि.क्र.१८ वर दाखल केलेला आहे. अर्जदार याने पुरसिस निशाणी क्रमांक १९ दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये आजपर्यंत कोणताही आक्षेप आलेला नाही. यावरुन असे दिसून येते की, भगवान बाबुराव पायघन यांचे दिनांक २९/१०/२०१५ रोजी निधन झालेले आहे. भगवान पायघन यांचे वारसाला मयत यांचे नावे असलेली टाटा सुमो गाडी अर्जदार क्र.४ यांच्या नावे वारस म्हणुन करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयत भगवान बाबुराव पायघन यांचे कायदेशिर वारस असल्यामुळे ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे, असे माझे मत आहे. पटलावर आलेला साक्षीपुरावा व सर्व परिस्थिती लक्षात घेता अर्ज मंजूर करण्यास पात्र असल्याचे माझे मत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्रमांक १ मंगला भगवान पायघन, अर्जदार क्रमांक २ सौ.जयश्री प्रभाकर पाटील, अर्जदार क्र.३ सौ.राजश्री किशोर धनवई, अर्जदार क्र.४ प्रमोद भगवान पायघन आणि अर्जदार क्र.५ सौ.भाग्यश्री राम नागोलकर हे मयत भगवान बाबुराव पायघन यांचे कायदेशिर वारस असल्यामुळे अर्जदार यांनां विहीत न्यायालयीन शुल्क स्विकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जदार याने सदर प्रमाणपत्राचा वापर केवळ उपरोक्त नमूद कामाकरीता करावा.

स्वा/-
(एस.व्ही.राजकुंटवार)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मेहकर.

दिनांक ०८/०८/२०१८

'C E R T I F I C A T E'

I, B.M.Shilwant, Jr. Clerk 2nd Jt. Civil Judge Jr.Dn., Mehkar affirm that, the content of this PDF order file is the same as per the original order.